# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३

**( सकाळी ११.०० वाजता )**

असुधारित प्रत

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्य मंत्री :** **(क)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** विधानसभेच्या सन २०२२ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १९ डिसेंबर, २०२२ ते दिनांक ३० डिसेंबर, २०२२ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण २७५ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२२ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ९६ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु, पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

**(१) सर्वश्री. शांताराम मोरे, प्रकाश सोळंके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"औरंगाबाद जिल्ह्यातील वाळुंज अधिसूचित क्षेत्राकरिता सन १९९१ मध्ये सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झाल्यानंतर सिडकोने सन १९९६

पासून जिल्हाधिकारी यांच्यामार्फत भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करणे यासाठी सन १९९८, २००० व २०१२ मध्ये भूसंपादनासाठी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध होणे, यातील काही जमिनींचे आगाऊ ताबे घेऊन त्यावर विकास कामे करणे, परंतु भूसंपादनाची कार्यवाही अद्यापही पूर्ण न होणे, जमीन मालकांना कोणत्याही प्रकारे मोबदला न देणे, सिडको ने मार्च, २०२० मध्ये ठरावाद्वारे प्रकल्पातील प्रलंबित भूसंपादनाची कार्यवाही परत घेण्याचा आणि नव्याने कोणत्याही जमिनीचे संपादन न करण्याचा निर्णय होणे, परंतु त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणे, जमीन धारकांच्या जमिनी जाणीवपूर्वक संपादनाच्या फेऱ्यात अडकवून ठेवून त्यांना विकास परवानगी न देणे, विकास परवानगी व सोयी सुविधा मिळवण्यासाठी सिडको कार्यालयासमोर वेळोवेळी आंदोलन होणे,मोर्चे निघणे, संपादनाच्या फेऱ्यात अडकलेल्या जमिनींच्या विकास कामांना परवानगी देणे बाबत शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सिडको कडून जमीनधारकांना कारण देणे बऱ्याच जमीनधारकांनी याबाबत माननीय उच्च न्यायालयात धाव घेणे, माननीय उच्च न्यायालयाने प्रलंबित भूसंपादनाबाबत शासनाने दिनांक ३१ जानेवारी, २०२३ पूर्वी निर्णय घ्यावा असे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी आदेश देऊनही याकडे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष सिडकोने प्रकल्पाचा आर्थिक व्यवर्हाता अहवाल शासनास सादर करणे, प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सुसह्य ठरत नसल्याने प्रलंबित असलेल्या १२४ हेक्टर क्षेत्रापैकी केवळ विकास कामे झालेले ७.३० हेक्टर क्षेत्राचे गुण संपादन पूर्ण उर्वरित क्षेत्रातील संपादन न करण्याच्या निर्णयावर सिडको ठाम राहून त्यासाठी शासनाची परवानगी मागणे, शासनाने सन २०२२ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सदर विषयी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना सिडकोच्या सदर निर्णयास सहमती असल्याचे आणि प्रकल्पातील आवश्यक त्या सोयी-सुविधा कालबध्द वेळेत पूर्ण करण्यासाठी सदर अधिवेशन संपता पंधरा दिवसाच्या आत लोकप्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्याबाबत सभागृहात आश्वासन देणे, परंतु या दोन्ही आश्वासनाची पूर्तता न करणे, माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच, या सार्वभौम सभागृहात आश्वासन देऊन सुद्धा या प्रलंबित प्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने भूधारकांमध्ये शासन सिडको यांच्याबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे व या सभागृहात दिलेले आश्वासनांचे तात्काळ पालन करून या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु, पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक २ ते ४)**

(२) **श्रीमती नमिता मुंदडा, श्री.संदिप क्षीरसागर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“बीड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या जल जीवन

मिशनयोजने मधील अनियमिततेबाबत अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अध्यक्षतेखाली ०६ सदस्यीय चौकशी समितीच्या अहवालातील दोषीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, बीड यांच्याकडे पाठवला असणे, परंतु प्रत्यक्षात बीड जिल्ह्यातील जलजीवन मधील सर्व घोटाळा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांच्या संमतीने झाला असणे, लोकप्रतिनिधी, लोकांच्या तक्रारी, वर्तमानपत्रात वारंवार बातम्या येत असतानाही कार्यवाही करण्याऐवजी दुर्लक्ष करून जलजीवनची कामे देतांना संबंधित एजन्सीना गंभीर त्रुटी असतांना कामे वाटप केलेली असणे, तसेच त्याच विभागातील कर्मचाऱ्यानी निविदा प्रक्रियेत अनियमितता करत स्वतःच्या मर्जीतल्या व नातेवाईकांच्या संस्थाना व ज्यांनी सर्वे व अंदाजपत्रके तयार केली त्या अभियांत्रिकी सल्लागार यांनाच नियमबाह्य कामे दिली असणे, या सर्व अनियमिततेला मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड यांनी न थांबवता पाठीशी घालून अनियमितता होऊ दिली असणे, त्यामुळे जलजीवनाच्या कामात झालेल्या भ्रष्टचाराला व अनियमिततेला प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. हे जबाबदार असणे, त्यामुळे त्यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांच्या अहवालातील दोषी अधिकारी, कर्मचारी, कॉन्ट्रॅक्टर, यांच्यावर कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(३) श्री. संतोष बांगर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शासन विविध शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थेमार्फत विविध कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करीत असणे, यामध्ये १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालक, स्वच्छता कर्मचारी, इतर कर्मचारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ३३ **KV** सब स्टेशन कंत्राटी ऑपरेटर ईत्यादी कर्मचारी हे शासकिय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्था मार्फत नियुक्त करण्यात येत असणे, परंतु सेवाभावी संस्था चालक हे शासनाने ठरवून दिलेले वेतन संबंधितांना न देता तुटपुंजे वेतन देत असल्याचे निदर्शनास येणे, यामध्ये महावितरण मधील ३३ **KV** सब स्टेशन मधील कंत्राटी ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बँक खाती स्वत: जवळच ठेवून शासनाने त्यांच्या खात्यावर टाकलेला पगार परस्पर उचलून ऑपरेटरला मात्र कमी पगार देण्याचे प्रकार घडत असल्याचे उघडकीस येणे, तसेच महाराष्ट्रातील १०२ कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना शासन १९ हजार ९०० रु प्रमाणे वेतन ठेकेदारास अदा करत असतांना ठेकेदार मात्र ८ ते १० हजार रुपये चालकांना देत असणे, तसेच त्यांचे मानधन चार-चार महिने अडवून ठेवण्यात येत असणे, त्यामुळे ज्या-ज्या शासकीय कार्यालयामध्ये सेवाभावी संस्थामार्फत कंत्राटी कर्मचारी नियुक्त करण्यात येत आहेत त्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन नियमाप्रमाणे मानधन देऊन ते मानधन प्रत्येक महिन्याला अदा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अतारांकित प्रत

**(४) श्री. चंद्रकांत नवघरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शेतकऱ्यांनी टोकाई सहकारी लि. कुरुंद्रा ता.वसमत, जि.हिंगोली या साखर कारखान्यास ऊस दिलेला असून दिनांक १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत कारखान्याने ऊस उत्पादक शेतकरी यांचे ऊसाचे पैसे दिलेले नसणे, या कारखान्याने खुल्या बाजारात साखर बर्गस मोलॅसेस राख हे खुल्या मार्केट विकले असून आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्याचे निदर्शनास येणे, सन २०२२-२३ या वर्षाच्या गाळपाचे अंदाजे १ लाख मेट्रीक टन ऊसाचे बील रुपये २० ते २२ कोटी शिल्लक असणे, सन २०२१-२२ या वर्षाचे ऊसाचे पैसे दिले नाहीत साखर आयुक्त, पुणे यांनी कारखान्यांवर **RRC** ची कारवाई केली व नंतर कारखाना प्रशासनाने कारखान्याची **FRP** १३ कोटी ६५ लाख रुपये शेतकऱ्यांना तीन हप्ते करुन देण्यात आल्याचे निदर्शनास येणे, आज रोजी कारखान्यात कुठलाही माल शिल्लक नसल्यामुळे साखर कारखान्याकडे सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षातील **FRP** चे पैसे देण्याबाबत शेतकऱ्यांकडून होत असलेली आग्रही मागणी तथापि टोकाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी थकीत असलेले ऊसाचे २३ कोटी रुपये देणे शक्य नसल्याचे मा.साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, परिणामी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर आलेली उपासमारीची पाळी, त्यासाठी शासनस्तरावरुन अध्यक्ष व संचालक मंडळास जबाबदार धरुन शेतकऱ्यांचे पैसे देण्याचे शासनाने आदेश देण्याची आवश्यकता, परिणामी शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झालेले भितीचे वातावरण व उदासिनतेची भावना, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. जयंत पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सांगली नजीक कृष्णा नदीत दत्त इंडिया संचालित वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या अनाधिकृत डिस्टलरीचे मळी मिश्रित पाणी कृष्णा नदीत मिसळल्याने मोठ्या प्रमाणात नदी प्रदूषित होऊन हरिपूर अंकली नजीक हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याची घटना समोर येणे, मृत माशांमुळे नदी मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाली असणे, यामुळे सांगली शहरासह जयसिंगपूर, मिरज, अंकली व शिरोळ तालुक्यांतील वीसहून अधिक गावांतील लोकांचे आरोग्य धोक्यात असल्याचे निदर्शनास येणे, कृष्णा नदीतील जलप्रदूषणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष्य, त्यामुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात पसरलेला तीव्र असंतोष, अनधिकृत डिस्टलरीवर कडक कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री.समीर कुणावार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"वर्धा जिल्हयाची हिंगणघाट शहरातील लोकसंख्या १ लाख ३० हजार असणे, हिंगणघाट नगरपरिषदेला अमृत योजने अंतर्गत टप्पा १ त्यासाठी ६१ कोटी ७९ लक्ष रुपये मंजूर होणे, त्यामध्ये २२२ किलोमिटरची पाईप लाईन, नविन फिल्टर प्लॉन्ट आणि शहरामध्ये ११ नविन पिण्याच्या टाक्या बांधुन पुर्ण होणे परंतु वणा नदीवर बंधारा नसल्याने पाणी पुरवठा न होणे, मा. प्रधान सचिव नवि-२, यांनी दिनांक २०/०९/२०१७ ला मुंबईत बैठक घेवून वणा नदी हिंगणघाट येथे नविन बंधारा बांधकाम करण्याबाबत आदेशित करणे, परंतु अजुनही नदीवर बंधारा मंजुर न होणे, दिनांक १४/०८/२०१९ ला हिंगणघाट नगरपरिषदने संपुर्ण त्रुटीची पुर्तता करुन संपुर्ण अहवाल संचालक नगरप्रशासन संचालनालय यांच्याकडे पाठविणे एकीकडे पाण्याच्या टाक्या, पाईप लाईन, सर्व जल शुध्दीकरण केंद्र नविन तयार असुन बंधारा नसल्यामुळे जनतेचे प्रचंड हाल होत असणे, त्यामुळे वारंवार मोर्चे आंदोलन होत असणे, अद्यापही बंधारा मंजूर न झाल्यामुळे जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. यशवंत माने, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मौजे चिंचोलीकाटी (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील एमआयडीसीमध्ये असलेला बालाजी अमाईन्स या कंपनीने अवैधरित्या हजारो ब्रास मुरुम व दगड यांचा उपसा केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये उघडकीस येणे, यासंदर्भात चौकशी केल्यानंतर तहसिलदार मोहोळ यांनी सदर कंपनीवर रु. २६ कोटी ५० लाख मुरुम यांचा उपसा केल्याबद्दल व रु.१६ कोटी ९६ लाख दगड काढल्याबाबत असा एकूण रु. ४३ कोटी ४६ लाख इतका दंड भरण्याची नोटीस दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी कंपनीला देणे, अद्यापही या कंपनीला दंडाची रक्कम भरली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी सदर प्रकरण तहसिलदार मोहोळ यांच्याकडून काढून घेऊन पुढील कार्यवाही करण्यासाठी तहसिलदार दक्षिण सोलापूर यांच्याकडे दिले असल्याचे उघडकीस येणे, हा बदल करण्याची कारणे काय आहेत, असा संभ्रम तेथील नागरिकांत पसरलेला असणे, याबाबत खुलासा करुन रु.४३ कोटी ४६ लाख ही दंडाची रक्कम बालाजी अमाईन्स या कंपनीकडून वसूल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर व यवतमाळ जिल्हयात अनेक सरकारी व खाजगी कोळसा खाणी असल्याने कोळसा माफियाकडून दोन्ही जिल्हयात नियमबाहय, अवैधरित्या कोलवॉशरीज सुरु असणे, नियमबाहय सुरु असलेल्या कोल माफीयांच्या कोलवॉशरीजकडे पोल्युशन सर्टिफिकेट, कॅमेन्स सर्टिफिकेट, सन २०२१ च्या शासन निर्णयानुसार साठा करावयाचा असल्यास डिलर परमीट यासह अनेक महत्वपुर्ण सर्टिफिकेट नसल्यामुळे कोल माफियाकडून मनमानी कारभार सुरु असणे, यात उच्च दर्जाच्या कोळशाची मोठया प्रमाणात चोरी होत असणे, अनेक ठिकाणी कोळसाच्या साठयाची नियमबाहय साठवणूक करण्यात येणे, या कोलवॉशरीजमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्याने नागरिकांना, दम्याच्या श्वसनाचा यासह इतर गंभीर आजार होणे, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महाराष्ट्र प्रदुषण मंडळाद्वारे २४ तास घेण्यात येणाऱ्या हवा गुणवत्ता निरीक्षणाची सन २०२२ ची धक्कादायक आकडेवारी समोर आली असून गत वर्षात ३६५ दिवसात चंद्रपूरमध्ये केवळ २९ दिवस प्रदूषण मुक्तीचे ठरणे, कोल वॉशरीजकडून मोठया प्रमाणात होत असलेली कोळसाची चोरी व प्रदूषण, याबाबत वारंवार तक्रारी होत असतांना सुध्दा कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातील मैंदर्गी गावाच्या सिटी सर्व्हे हा सन २०११-१२ साली विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या मार्फत नेमण्यात आलेल्या खाजगी कंपनी कडून करण्यात आलेला असणे, सदर सिटी सर्व्हेच्या कामामध्ये ७०% पेक्षा जास्त धारकांच्या नावामध्ये, क्षेत्रामध्ये, नकाशामध्ये व सिटी सर्वे नंतर वाटप केलेल्या सनदा मध्ये चुकीच्या पद्धतीने नोंद होणे, त्यानंतर नागरिकांच्या तक्रारी प्राप्त असणे, उपअधीक्षक, भूमिअभिलेख, अक्कलकोट यांनी मैंदर्गी शहरचा फेरसिटी सर्व्हे करण्याचा प्रस्ताव पाठवला असणे, मलकापुर शहराचा व मैंदर्गी शहराचा सिटी सर्वे एकाच कंपनीकडून करणे, मलकापुर शहराचा फेर सिटी सर्व्हे केला असणे, मैंदर्गी शहराचा चुकीचा झालेला सिटी सर्वे रद्द करून फेर सिटी सर्व्हे केल्याने सर्वांना न्याय भेटेल, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(१०) श्री. किसन कथोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"केंद्र शासनाने वन अधिनियम १९७८ मधील काही कलमे निरसित करून वनाचे संवर्धन व संरक्षण करण्या संबंधी राज्यांनी कायदा व नियम बनवले असे निर्देश दिलेले असणे, त्यानुसार महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम विधानमंडळाने पारित केला असणे, सदर नियमातील सुधारणा कलम २३ (अ) (१) अन्वये मूळ मालकासह चरितार्था साठी १२ हेक्टर एवढी जमीन पुनास्थापित करण्याची तरतूद करण्यात आलेली असणे, याबाबत कोर्टाचे अनेक निर्णय असून ज्या खाजगी वन जमिनीचे राजपत्र झाले नसेल व वन खात्याने ताबा घेतला नसेल व मोबदला दिला नसेल अश्या जमिनी परत करण्याचे आदेश असताना २२ (अ) (१) खाली पुनास्थापित करावयाच्या व इतर कमी क्षेत्राच्या जमिनीच्या ७/१२ सदरी खाजगी वने व वनेत्तर कामा व्यतिरिक्त वापरास बंदी अशे शेरे दाखल केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र नाराजी पसरलेली असणे, सबसिडी व शासनाच्या अनेक योजना कर्ज घेण्यात येणारी अडचण, जमिन विकसित करण्यासाठी येणारे अडथळे त्यामुळे वन व महसूल खात्याकडून होणारी प्रचंड पिळवणूक व त्या मध्ये निर्माण होत असलेला उद्रेक, अगदी वडिलोपार्जीत अल्प भूधारक शेतकऱ्यांची जमीन विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात मोडणारी जमीन तसेच राज्याच्या विकासासाठी रस्ते व इतर प्रकारच्या शेजारील जमीन वनखात्याच्या शेऱ्यामुळे विकसित न करता येत असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर पसरलेला संताप, हतबल पनाची भावना व शेतकऱ्यांची खुंटलेली प्रगती याबाबत राज्यानेच पारित केलेल्या अधिनियमातील कलम २ (क) (१) व कलम ३ मध्ये संशोधन करण्याची नितांत गरज असणे, शेतकऱ्यांच्या प्रगती आड येणारी मुख्य वन संरक्षक यांनी पारीत केलेली शासन परिपत्रके दिनांक १६/१२/२००४, दिनांक २२/०२/२००५ व दिनांक १४/०७/२००४ ही शासनाच्या दिशाभूल करून व महाराष्ट्र खाजगी वने अधिनियम १९७५ च्या तरतुदी विरुद्ध व न्यायालयीन निर्णयांची अवहेलना करणारी परिपत्रके रद्द करण्याबाबत मा.मंत्री वने हे तातडीने कार्यवाही करतील काय ? सदरची पत्रके रद्द करून केंद्र सरकारच्या दिनांक २०/६/२०१७ रोजीच्या बैठकीत जमिनीच्या खरेदी-विक्रीबाबत आक्षेप नसल्याने मा.मंत्री महसूल यांनी तसे परिपत्रक काढून गरजू असलेल्या शेतकऱ्यांना खरेदी-विक्री व्यवहार करणेसाठी परवानगी देतील का याचा खुलासा या सभागृहासमोर करतील काय ? याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) सर्वश्री. महेश बालदी, प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील रसायनी पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील अनेक कंपन्या तसेच अमेटी युनिवर्सिटी, भाताण यांच्यामार्फत मालमत्ता

अप्रकाशित

कर त्या त्या हद्दीतील ग्रामपंचायतींना अद्यापपर्यंत मिळाला नसणे, सदर मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींना विकासकामे करताना अनेक अडचणी निर्माण होत असणे, ग्रामपंचायतींकडे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नसल्यामुळे कंपन्यांकडून व अमेटी युनिवर्सिटीकडून मिळणाऱ्या मालमत्ता करावर ग्रामपंचायतींचा विकास अवलंबून असणे, कंपनी व युनिवर्सिटीकडून मालमत्ता कर न मिळाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या विकासाला अडथळा निर्माण होत असणे, उक्त परिसरातील ग्रामपंचायतींमधील कामगारांचे वेतन, पाणीपट्टी कराची रक्कम, तसेच अनेक मुलभूत समस्यांना सातत्याने ग्रामपंचायतींना सामोरे जावे लागत असणे, उक्त ग्रामपंचायतींना मुलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्या तीव्र रोषाला स्थानिक लोकप्रतिनिधींना सातत्याने सामोरे जावे लागत असणे, त्यामुळे पनवेल तालुक्यातील अमेटी युनिवर्सिटी, भाताण तसेच रसायनी पाताळगंगा परिसरातील कंपन्यांकडून ग्रामपंचायतींना मिळणारा कर तातडीने मिळण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) डॉ. राहूल आहेर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्हयाचा टंचाई अंतर्गत गांव, वाडी, वस्ती यांना टँकरने पाणी पुरवठा करणेसाठी टँकर मंजुर करतांना शासन नियमानुसार सर्व प्रथम जिल्हयात उपलब्ध असलेले शासकिय टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेबाबत निर्देश असल्याने शासकिय विभागांकडे उपलब्ध असलेले टँकर यांचे पाणी पुरवठा करणेबाबत आदेश होणे, सदर शासकिय टँकर गटविकास अधिकारी यांचे कार्यालयात हजर झाल्यानंतर सर्वाधित तालुक्याचे गटविकास अधिकारी हे स्थानिक पातळीवर डिझेल पुरवठादार यांचेशी संपर्क साधुन टँकरसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होईल व त्यांव्दारे त्यांचे देयकाचे वितरण केले जाईल या अटीवर डिझेल पुरवठा करणेबाबत विनंती करत असणे, या टंचाई कालावधीत नाशिक जिल्हयात एकूण १४ शासकिय टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरू असणे, सदरच्या तालुक्यांना टँकरव्दारे माहे एप्रिल, २०२२ ते जून, २०२२ या कालावधीत नियमितपणे सुरु असणे, यासाठी सुमारे ३ महिन्याचा कालावधी होऊन गेल्याने व शासनाकडुन निधी प्रलंबीत असल्याने संबंधीत डिझेल पुरवठादार यांनी संबधीत गटांकडे देयक मिळणेबाबत विनंती केलेली असल्याने गटविकास अधिकारी यांनी शासनाकडे वारंवार मागणी करणे, परंतु सदरचा निधी अद्याप अप्राप्त असणे, यामध्ये चांदवड ५४५५००० व देवळा २२००००० निधी प्रलंबित असणे, नाशिक जिल्ह्याचे एकूण ५४४६६१० इतका निधी प्रलंबित असणे, आगामी काळातही पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाकडून टँकरद्वारे पुरवठा होणार असल्याने प्रलंबित देयके तात्काळ देणे गरजेचे असणे, त्यामुळे याबाबत शासनाने तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

अप्रकाशित प्रत

**(१३) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"अमरावती शहर "ड" वर्ग महानगरपालिका असुन आजची लोकसंख्या ८ लक्ष असून सन १९८३ पासुन अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मजीप्रा मार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अमरावती शहरापासुन ५५ कि.मी. दुर असलेल्या अप्पर वर्धा धरण, मोर्शी येथुन शहराकरीता पाणी पुरवठा करण्यात येत असणे, अस्तित्वातील योजना सन १९८६ मध्ये मंजुर झाली असुन १९९४ ला कार्यान्वीत करण्यात येणे, अमृत १.० मध्ये केवळ शहरांतर्गत वितरण व्यवस्था, जलशुद्धिकरण केंद्र व उंच साठवण टाक्या अस्तित्वातील १५६ दशलक्ष प्रवाह क्षमतेची जलवाहिनी विचारात घेवुन प्रस्तावित करण्यात येणे, यामुळे योजनेतील ३१ कि.मी. लांब **PSC** गुरुत्ववाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्यमान सन २०२४ मध्ये संपत असून ही पाईपलाईन कमकुवत झाल्यामुळे वारंवार फुटत असून व दुरुस्तीकरीता शहराचा पाणी पुरवठा ३-४ दिवस खंडित राहत असल्याने ही योजना अमृत २.०० योजनेतून करण्यासाठी मागील ३ वर्षापासून वारंवार मागणी करुनही व जिल्हा स्तरावर याबाबतचा प्रस्ताव दोन वेळेला राज्य शासनाकडे पाठवुनही या प्रस्तावाला मान्यता देण्यात न येणे, जुनी जिर्ण झालेले आयुष्यमान संपुष्टात आलेली सिमेंटची गुरुत्वाहिनह बदलविणे अत्यावशक असून त्या सोबतच अतिरीक्त उध्ववाहिनी क्षमता वाढविण्याकरीता अंथरणे आवश्यकता असतांना या योजनेला अमृत २.०० या मधुन मान्यता मिळत नसल्यामुळे ही योजना पुर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे अमरावती शहराला पाणी पुरवठया पासून वंचित राहण्याची निर्माण झालेली भिती, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन अमरावती शहरासाठी नियोजित पाणी पुरवठा योजनेला अमृत २ अंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन सदर योजना तातडीने पुर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री.राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"धाराशिव जिल्हा अवर्षण प्रवण असून जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न व मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरी पेक्षा कमी असणे, औद्योगिकरणाचा अभाव व कृषी क्षेत्रासाठी अपुरे शाश्वत सिंचन यामुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त असणे, या बाबी लक्षात घेऊन निती आयोगाने निवडलेल्या आकांक्षीत जिल्ह्यांमध्ये धाराशिव जिल्ह्याचा समावेश असणे, त्यामुळे येथील आर्थिक मागासलेपण दुर करण्यासाठी औद्योगीकीकरणाला चालना देणे आवश्यक असणे, ही बाब लक्षात घेऊन सन २०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी महा जनादेश यात्रा दरम्यान धाराशिव

जिल्हयातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी धाराशिव येथील कौडगाव औद्योगिक वसाहतीमध्ये टेक्निकल टेक्स्टाईल पार्क उभारण्याची घोषणा केली असणे, या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल देखील सादर करण्याचे आदेशीत केले असणे, या अनुषंगाने के.पी.एम.जी. संस्थेच्या माध्यमातुन एमआयडीसी ने प्राथमिक अहवाल तयार करणे, परंतू महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यापासून दुर्देवाने हा विषय प्रलंबित राहिलेला असणे, इतर वस्त्रनिर्मिती उद्योगापेक्षा तांत्रिक वस्त्र (टेक्निकल टेक्सटाईल) उत्पादनाला जगभर अधिकचा वाव असल्याने धाराशिव सारख्या आकांक्षित जिल्ह्यात या प्रकारचा उद्योग उभारल्यास किमान १० हजार रोजगार निर्मीतीसह येथील अर्थकारणाला मोठी चालना मिळणार असणे, आकांक्षित जिल्ह्याच्या विकासाबाबत केंद्र सरकार अतिशय सकारात्मक असुन देशाचे पंतप्रधान यांच्यावर विशेष लक्ष असणे, तांत्रिक वस्त्र निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयाकडून नॅशनल टेक्नीकल टेक्सटाईल मिशन ही योजना राबविली जात असणे, कौडगांव,धाराशिव येथे राज्यातील पहिल्या तांत्रिक वस्त्र निर्मिती प्रकल्पाची घोषणा केली असणे, ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी व धाराशिव औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वस्त्रोद्योग, एमआयडीसी व के.पी.एम.जी च्या माध्यमातून त्वरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**चार : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (चौथा दिवस)**

(१) महसूल व वन विभाग

(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) सार्वजनिक बांधकाम विभाग

(४) मृद व जलसंधारण विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

(१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ — महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३.

अस्वीकृत प्रत

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३.

(३) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

अप्रकाशित प्रत

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती आदिती तटकरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती

घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(झ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

अप्रकाशित प्रत

**(३) (क) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अजित पवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.मोहनराव हंबर्डे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ — महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अप्रमाणित प्रत

**(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, जितेश अंतापूरकर, संजय जगताप, बळवंत वानखडे, अमित झनक, शिरीषदादा चौधरी, विकास ठाकरे व अमिन पटेल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.छगन भुजबळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ज) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री रविंद्र वायकर व दिलीप वळसे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

अग्रिम प्रत

---

**(शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सहा : **ॲड. आशिष शेलार, श्रीमती यामिनी यशवंत जाधव, सर्वश्री योगेश सागर, सदा सरवणकर, अमित साटम, भरतशेठ गोगावले, अतुल भातखळकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री कालीदास कोळंबकर, किसन कथोरे, कुमार आयलानी, गणपत गायकवाड, गणेश नाईक, नितेश राणे, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री पराग शाह, प्रशांत ठाकूर, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, मनिषा**

**चौधरी, माधुरी मिसाळ, सर्वश्री महेश चौघुले, मिहीर कोटेचा, राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय केळकर, सुनील राणे, सर्वश्री प्रकाश आबिटकर, चिमणराव पाटील, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, योगेश कदम, संजय गायकवाड, डॉ. संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबध्द कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या नाविन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन कामही सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी. रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची ६ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भुमिपूजन मा.पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी. मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्दयामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसर यामध्ये वाहतुक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पुर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सिमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरावस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबध्द स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे तसेच, एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ठ

प्रकरणाबाबत शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरुन पदपथ मोकळे होऊन वाहतुक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांच्या पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पध्दतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकिय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परिक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्त्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महापालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस रोडावल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महापालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री. अजित पवार, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, छगन भुजबळ, अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, आदित्य ठाकरे, अजय चौधरी, दिलीप वळसे-पाटील, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री भास्कर जाधव, धनंजय मुंडे, रविंद्र वायकर, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), सर्वश्री राजेश टोपे, सुनिल केदार, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री अमित देशमुख, अनिल देशमुख, अबू आजमी, विनोद निकोले, रईस शेख, बाळासाहेब पाटील, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, संग्राम थोपटे, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री राजन साळवी, दिलीपराव बनकर, चेतन तुपे, सुनिल शेळके, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री शिरीष चौधरी, अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अमीन पटेल, कुमारी प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजित कदम, डॉ. राजेंद्र शिंगणे, सर्वश्री सुनिल राऊत, कुमारी आदिती तटकरे, श्रीमती सरोज आहिरे, सर्वश्री दिलीप मोहिते-पाटील, दत्तात्रय भरणे, ॲड. अशोक पवार, सर्वश्री सुनिल टिंगरे, प्राजक्त तनपूरे, रोहित पवार, निलेश लंके, आशुतोष काळे, संजय बनसोडे, बबनराव शिंदे, यशवंत माने, दिपक चव्हाण, मकरंद जाधव-पाटील, शेखर निकम, राजेश पाटील, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मानसिंग नाईक, देवेंद्र भुयार, संजयमामा शिंदे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, सुनिल भुसारा, अतुल बेनके, अण्णा बनसोडे, संग्राम जगताप, वैभव नाईक, संजय पोतनीस, श्रीमती ऋतुजा लटके, सर्वश्री कुणाल पाटील, विकास ठाकरे, कैलास गोरंट्याल, संजय जगताप, रणजीत कांबळे, लहू कानडे, ऋतुराज पाटील, राजु आवळे, पी. एन. पाटील (सडोलीकर), विक्रमसिंह सावंत, नितीन पवार, शिरीषकुमार नाईक, डॉ. राहूल पाटील, अमित झनक, राजु पारवे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री मनोहर चंद्रिकापूरे, इंद्रनिल नाईक, चंद्रकांत नवघरे, राजू कारेमोरे, प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, बाबासाहेब पाटील, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रमेश कोरगांवकर, कैलास घाडगे-पाटील, नितीन देशमुख, उदयसिंग राजपुत, राजेश एकडे, बळवंत वानखडे, सहसराम कोरोटे, सुभाष धोटे, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, झीशान सिद्दिकी, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री. माधवराव पवार, धिरज देशमुख, रवींद्र धंगेकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वत:कडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या

अप्रकाशित प्रत

प्रकरणांमुळे निवडणुका दीर्घकाळ रखडल्या असणे, राज्यातील महानगरपालिकांत, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करुन निधीची उधळपट्टी होत असणे, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईत विनापरवाना पाणी उपसा करुन होणारी विक्री, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, विक्रोळी कन्नमवार नगर येथील ३८ सोसायट्यांच्या पुनर्विकासातील अडथळा दूर करण्याची गरज, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिंडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेल्या अनियमितता, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत झालेला घोटाळा, आपला दवाखान्यांमध्ये असलेला औषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गोखले ब्रीजच्या पाडकामामुळे मुंबईच्या पश्चिम उपनगरात वाहतूकीचा उडालेला बोजवारा, मुंबईत वाढलेले धुळीचे साम्राज्य व प्रदूषण, सफाई कामगारांच्या आश्रय योजनेत निर्माण झालेल्या समस्या, महारेराने ५१ टक्के खरेदीदारांच्या मंजुरीची अट काढून टाकण्याचा घेतलेला धक्कादायक निर्णय, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, ठाणे महानगरपालिकेतील मग्रुर व मस्तवाल सहाय्यक आयुक्तांचे गँगस्टरशी असलेले संबंध त्यात त्यांनी अनेक बेकायदेशीर कामे केली असल्याचे तसेच गुंडाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना धमकावत असल्याचे उघडकीस येणे, ठाण्यातील समूह पुनर्विकास योजनेची घोषणा झाली असली तरी अंमलबजावणी होत नसणे, ठाणे शहर सार्वजनिक परिवहन सेवा मोडकळीस आली असणे, धारावी पुनर्विकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक अटींना होणारा विरोध, नवी मुंबईतील भूमीपुत्रांनी बांधलेली घरे नियमित करण्याचा रखडलेला निर्णय, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे, पुणे महानगरपालिकेत विकासकांचा वाजलेला बोजवारा, मेट्रो सेवेचे विस्तारीकरण, पुणे महानगर विकास प्राधिकरणाचा आराखडा, रिंग रोडचे भूसंपादन, यात होत असलेला विलंब, विविध महापालिकांतून वगळलेल्या गावांच्या विकासाचा निर्माण झालेला प्रश्न, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची

अध्यक्षित प्रत

आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुनर्विकास, राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

असुधारित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १७ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा